CMYK

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

कोल्हापूर | सांगली | सातारा | सोलापूर | धाराशिव | लातूर | वर्ष 3 रे | अंक 106 वा | शनिवार , 11 जुलै 2026 | पाने 04 | किंमत रू.4 | epaper.arambhmarathi.com

**सुविचार**

आयुष्य म्हणजे स्वतःला ओळखण्याचा प्रवास आहे, जिथे प्रत्येक अनुभव आपल्याला घडवत असतो.




# सुविधा शून्य, तरीही भाव पुण्याच्या बरोबरीचे!

## धाराशिवमध्ये २ बीएचके फ्लॅट ६२ लाखांवर, रो-हाऊस ८० लाखांपर्यंत

### कोणत्याही आधुनिक सुविधा नसताना धाराशिवमध्ये घरांचे दर गगनाला; सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना घरांच्या किमतींनीही मोठी झेप घेतली आहे. शहरात २ बीएचके फ्लॅटसाठी तब्बल ६२ लाख रुपये, तर रो-हाऊससाठी ६५ ते ८० लाख रुपये मोजावे लागत आहेत. विशेष म्हणजे, या किमती पुण्यासारख्या महानगरांच्या बरोबरीने पोहोचल्या असल्या तरी त्यानुसार आधुनिक सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांमधून आश्चर्य व्यक्त होत आहे. पुण्यात नामांकित बांधकाम व्यावसायिकांच्या प्रकल्पांमध्ये ६० लाखांच्या आसपास २ बीएचके फ्लॅट उपलब्ध होत असून, त्याठिकाणी क्लब हाऊस, जिम, स्विमिंग पूल, मुलांसाठी खेळण्याची जागा, सीसीटीव्ही सुरक्षा, लँडस्केप गार्डनसह ३० ते ४० प्रकारच्या सुविधा दिल्या जातात. धाराशिवमधील बहुतांश गृहप्रकल्पांमध्ये यापैकी अनेक सुविधा उपलब्ध नसतानाही फ्लॅटच्या किमती सातत्याने वाढत आहेत.

धाराशिव शहरातील एकाही गृहप्रकल्पात पुण्यातील मोठ्या टाउनशिपप्रमाणे स्विमिंग पूल, सुसज्ज जिम, आधुनिक क्लब हाऊस किंवा नियोजित प्ले एरिया उपलब्ध नाही. असे असतानाही फ्लॅटचे दर झपाट्याने वाढत असल्याने ग्राहकांमध्ये संभ्रम आणि नाराजी व्यक्त होत आहे. याच कारणामुळे शहरात अपेक्षित प्रमाणात फ्लॅट संस्कृती विकसित होत नसल्याचे दिसून येते. अनेक रिसेल फ्लॅट वर्षानुवर्षे विक्रीसाठी उपलब्ध राहतात, तसेच त्यांच्या किमतींमध्येही फारसा बदल होत नसल्याचे रिअल इस्टेट क्षेत्रातील जाणकार सांगतात. बैठ्या घरांना अधिक पसंती धाराशिवमध्ये फ्लॅटपेक्षा स्वतंत्र बैठ्या घरांना अधिक मागणी आहे. काही वर्षांपूर्वी शहरातील रिकाम्या प्लॉटचे दर मोठ्या प्रमाणात वाढले होते. मात्र आता शिंगोली, वडगाव, सांजा, जाधववाडी, वरुडा, बार्शी रोड, घाटंग्री आदी परिसरात मोठ्या प्रमाणावर नवीन ले-आऊट विकसित होत असल्याने प्लॉटची उपलब्धता वाढली आहे. परिणामी मागणीच्या तुलनेत पुरवठा वाढत असून, प्लॉटच्या किमती कमी होण्याची चिन्हे आहेत. अनेक नवीन विकासक या व्यवसायात उतरल्याने येत्या काळात वाढलेल्या दरांचा फुगवटा कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



**सुविधा नाहीत, तरीही दर वाढले**

धाराशिवमध्ये २ बीएचके फ्लॅटसाठी ६० लाखांहून अधिक किंमत मोजावी लागत असताना पुण्यात त्याच किंमतीत अत्याधुनिक सुविधांसह फ्लॅट उपलब्ध होतात. मात्र धाराशिवमध्ये सुविधा मर्यादित असतानाही दर सातत्याने वाढत आहेत. दुसरीकडे, नवीन फ्लॅटच्या किमती वाढल्या असल्या तरी रिसेलला अपेक्षित गती नाही. अनेक फ्लॅट दीर्घकाळ विक्रीसाठी उपलब्ध राहतात, तर खरेदीदारांचा कल स्वतंत्र घर किंवा प्लॉटकडे अधिक असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वाढत्या किमती आणि प्रत्यक्ष पुनर्विक्री बाजारातील वास्तव यामध्ये मोठी तफावत असल्याची चर्चा रिअल इस्टेट क्षेत्रात होत आहे.

# धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे भूसंपादन प्रकरणी महसूल मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक

## आमदार कैलास पाटील यांनी मांडली बाधित शेतकऱ्यांची बाजू

**धाराशिव** :- धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे प्रकल्पासाठी भूसंपादन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना मोबदला देताना झालेल्या अन्यायाच्या पार्श्वभूमीवर विधानभवन, मुंबई येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आमदार कैलास पाटील यांनी या बैठकीसाठी प्रयत्न केले होते. या बैठकीत संबंधित प्रकरणाचा सविस्तर आढावा घेण्यात आला असून, बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली. धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वे प्रकल्पासाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. मात्र, जमिनीच्या बदल्यात मिळालेला मोबदला अपुरा असून बाजारभावानुसार नुकसानभरपाई मिळालेली नसल्याचा आरोप करत बाधित शेतकरी मागील काही महिन्यांपासून विविध मार्गांनी आंदोलन करत आहेत. प्रशासनाकडे वारंवार निवेदने देणे, आंदोलने आणि पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. या वादामुळे रेल्वे प्रकल्पाच्या कामावरही परिणाम झाला असून, काही ठिकाणी कामाची गती मंदावल्याचे चित्र आहे. त्यामुळे प्रकल्प रखडण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्र्यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला. बाधित शेतकऱ्यांच्या मागण्या, मोबदला निश्चितीची प्रक्रिया तसेच पुढील उपाययोजनांबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा न्याय्य मोबदला मिळावा आणि प्रकरण लवकरात लवकर निकाली निघावे, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती मिळाली आहे.

# मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त १,४०६ जलसंरचनांच्या दुरुस्तीला गती

## मंत्री दादाजी भुसे यांची माहिती

**मुंबई** :- मराठवाड्यात ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या १,४०६ जलसंरचनांच्या दुरुस्तीची कामे टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात आली असून, त्यासाठी आवश्यक निधी आणि प्रशासकीय मान्यतेची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी प्रश्न उपस्थित केला. मंत्री दादाजी भुसे म्हणाले, क्षतिग्रस्त योजनांपैकी ४०३ योजनांमध्ये भराव काम झालेल्या ठिकाणी भराव टाकणे आणि नाल्यांचे खोलीकरण करण्याची कामे सुरू आहेत. यापैकी १९६ कामे पूर्ण झाली असून २०७ कामे प्रगतीपथावर आहेत. ४ मे २०२६ रोजीच्या निर्णयानुसार भराव टाकण्याचे काम अशासकीय संस्थांमार्फत करण्यासाठी प्रति घनमीटर २१ रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

# वाहतूक पोलीस अविनाश भुतेकर यांच्या सतर्कतेने टळला मोठा अनर्थ; विद्युत डेपोतील आग आटोक्यात

**धाराशिव** :- धाराशिव येथील एसटी बसस्थानकासमोरील विद्युत (इलेक्ट्रिक) डेपो परिसरात शुक्रवारी (दि.१०) अचानक आग लागल्याची घटना घडली. मात्र, घटनास्थळी कर्तव्यावर असलेले वाहतूक पोलीस अविनाश भुतेकर यांनी प्रसंगावधान राखत तातडीने संबंधित विभागाला माहिती दिल्याने संभाव्य मोठा अनर्थ टळला. आग लागल्याचे लक्षात येताच भुतेकर यांनी तात्काळ अग्निशमन यंत्रणा व संबंधित विभागाशी संपर्क साधला. तसेच परिसरातील नागरिकांना सुरक्षित अंतरावर जाण्याच्या सूचना देत वाहतुकीचे नियोजन केले. त्यांच्या तत्परतेमुळे घटनास्थळी गर्दी होण्यापासूनही प्रतिबंध झाला. वेळेवर करण्यात आलेल्या हालचालींमुळे आग आणखी पसरून मोठे नुकसान होण्याची शक्यता टळली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसून, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. संबंधित विभागाकडून आगीच्या कारणाचा तपास सुरू आहे. कर्तव्यदक्षता, सतर्कता आणि प्रसंगावधानाचे दर्शन घडविणाऱ्या वाहतूक पोलीस अविनाश भुतेकर यांच्या कार्याचे नागरिकांकडून कौतुक होत असून, त्यांच्या तातडीच्या निर्णयामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याची भावना व्यक्त केली जात आहे.




आरंभ मराठी | २०१९ मध्ये लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांचेही दोन लाख रुपयांपर्यंत कर्ज होणार माफ

# शेतकऱ्यांना दिलासा, अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द

आरंभ मराठी । धाराशिव

राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक निकष शिथिल करण्याची घोषणा केली आहे. विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा करत कर्जमाफीच्या लाभार्थ्यांची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचे स्पष्ट केले. या निर्णयासाठी विरोधी पक्ष, शेतकरी संघटना आणि विविध सामाजिक संघटनांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. आमदार रोहित पवार, शेतकरी नेते रविकांत तुपकर तसेच किसान सभेने कर्जमाफीतील जाचक अटी हटविण्याची मागणी अनेक महिन्यांपासून लावून धरली होती. या मागणीसाठी रोहित पवार यांनी पंढरपूर येथे दोन दिवसांचे उपोषणही केले होते. त्यावेळी सरकारने अटींमध्ये बदल करण्याचे आश्वासन दिले होते. अखेर त्या आश्वासनाची पूर्तता करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही आता नव्या योजनेअंतर्गत थेट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वी अशा शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपयांपर्यंतच्या लाभाची अट होती. ती आता हटविण्यात आली आहे. याशिवाय, सन २०२६-२७ मध्ये कर्जाची नियमित परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे.




यापूर्वीच्या निकषांमुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत होते. आता मागील तीन वर्षांपैकी दोन वर्षे नियमित कर्जफेड केलेले शेतकरीही कर्जमाफीसाठी पात्र ठरणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी २०२६ मध्ये कर्जाची परतफेड केली असली, तरी काही नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि आर्थिक अडचणींमुळे अनेक शेतकरी नियमित कर्जफेड करू शकले नव्हते. त्यामुळे कठोर निकषांमुळे हजारो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची शक्यता होती. नव्या निर्णयामुळे अशा शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. विरोधी पक्षांनी या निर्णयाचे स्वागत केले असले तरी कर्जमाफीची अंमलबजावणी जलदगतीने करून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात लाभ लवकर जमा करावा, अशी मागणीही केली आहे. या निर्णयामुळे कर्जमाफी होण्यास आणखी काही कालावधी लागणार आहे.

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज


श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५




आज ११ जुलै, आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले. तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. १९८७ ते २०२१ अवघ्या ३४ वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात अब्जांपर्यंत पोहचली. याचाच अर्थ याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत चालली आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. २०२३ साली भारताने चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने २०२३ साली जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या चीनपेक्षा अधिक आहे. भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. आज भारताची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेली असण्याची शक्यता आहे. यावर्षी सुरू असलेल्या जनगणनेची आकडेवारी समोर आल्यावर त्याची पुष्टी होईलच. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारत आणि चीन या दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत असून भारताच्या लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक असल्याचे नमूद केले आहे. आज भारताची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या ३० कोटी इतकी होती. याचाच अर्थ मागील ७९ वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११५ कोटींनी वाढली आहे. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढत चाललेल्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठी अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. वाढती लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासन स्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या अट्टाहासापाई तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभाग ही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम जोर धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिढीमध्ये योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी नव्या पिढीला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे . अवघ्या ३४ वर्षात जगाची लोकसंख्या ५ अब्जांनी वाढली तर देशाची लोकसंख्या ७९ वर्षात ११५ कोटींनी वाढली. या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही. त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर होईल हे नव्या पिढीला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर त्याचे दुष्परिणाम आपल्याला सहन करावे लागेल. आपण जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालवाच लागेल हे नवीन पिढीला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम , निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती द्यायला हवी त्यासाठी त्यासाठी शाळा महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नाही तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

## बदल


### आनंदाचे डोही..


सारिका देशमुख
धाराशिव
96579 64260

बदल हा निसर्गाचा अटळ नियम आहे. 'हवामान, ऋतुमान बदलतात'. दिवस-रात्र होतात. निसर्गाचे हे कालचक्र कायम चालूच राहते . जसे निसर्ग बदलतो त्याप्रमाणे माणूसही बदलत असतो. पण निसर्गाचा होणारा बदल हा सर्जनशील असतो . 'हेही खर आहे'. पण मानवात होणारा बदल हा कधी सकारात्मक ही असू शकतो आणि नकारात्मक ही असू शकतो. 'माणूस वेळेनुसार परिस्थितीनुसार बदलत जातो'. कधी स्वार्थापोटी बदलत असतो तर कधी दुसऱ्यासाठी स्वतःमध्ये बदल करत असतो. जेव्हा माणूस बदलतो तेव्हा तो पूर्णपणे आपल्या मूळ स्वभावात बदल करत नाही तर 'थोड्याफार प्रमाणात तो बदललेला असतो. सहवासाचा प्रभाव प्रत्येकावर पडत असतो जसं सुगंधित फुलाच्या दरवळाने वातावरण प्रफुल्लित होतं. तसेच चांगल्या माणसाच्या सहवासाने स्वभावात सकारात्मक बदल होत असतात. प्रत्येक बदल हा वाईट नसतोच मुळी. काही बदल नव्याने आयुष्याची योग्य दिशा ठरवत असतात. जीवनात काही प्रसंग काही घटना अश्या घडतात की त्या त्याला बदलायला भाग पाडतात . एखादी सवय सोडणं सोपं नसतं पण स्वतःच्या स्वाभिमानासाठी किंवा जीवनातील मोठ्या ध्येयासाठी स्वतःमध्ये केलेला बदल हा नैसार्गिक वाटतो. प्रेमात हे बदल घडतात. एखाद्यासाठी आपण स्वतःमध्ये अनेक बदल करतो. तेव्हा समोरच्यानेही आपल्याला समजून घ्यावे आपल्यासाठी काही बदल स्वीकारावेत अशी अपेक्षा मनात निर्माण होणे पूर्णपणे स्वाभाविक आहे .मात्र बदल हा दबावाखाली नव्हे तर मनापासून स्वीकारला गेला तरच टिकतो.खरा बदल म्हणजे स्वतःची ओळख हरवणे नव्हे तर स्वतःतील उणिवा दूर करून अधिक परिपक्व आणि संवेदनशील आणि समंजस माणूस बनणे होय . बदल स्वीकारणारा माणूस काळाबरोबर पुढे जातो आणि हाच बदल त्याच्या यशाची पहिली पायरी ठरते.**बदल करावा आत्मसन्मानासाठी**

**बदल करावा स्वाभिमानासाठी**
**पण बदल करू नये कधीच**
**लाचारीसाठी...**

# गडकिल्ले हे खून, आत्महत्या किंवा गुन्हेगारी कृत्यांसाठी नव्हेत, ते प्रेरणा घेण्यासाठी आहेत!




शुभम राखुंडे,
कळंब
मो. 91 7821059890

महाराष्ट्राला लाभलेला गडकिल्ल्यांचा वारसा हा केवळ ऐतिहासिक ठेवा नसून तो आपल्या स्वाभिमानाचा, पराक्रमाचा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करताना या गडकिल्ल्यांचा वापर जनतेच्या संरक्षणासाठी, न्यायासाठी आणि स्वराज्याच्या विस्तारासाठी केला. त्यामुळे गडकिल्ले हे केवळ दगड-मातीच्या वास्तू नसून ते लाखो शिवप्रेमींसाठी प्रेरणास्थान आहेत. मात्र, अलीकडील केतन अग्रवाल प्रकरणाच्या निमित्ताने पुन्हा एकदा गडकिल्ल्यांच्या पावित्र्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार, या प्रकरणात लोहगड किल्ल्याचे नाव समोर आले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रातील शिवप्रेमी, इतिहासप्रेमी आणि गडसंवर्धक यांना अस्वस्थ केले आहे. एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यात मतभेद, तणाव किंवा वाद असू शकतात. परंतु अशा कोणत्याही कारणासाठी गडकिल्ल्यांची निवड करणे अत्यंत चुकीचे आहे. गडकिल्ले हे कोणाचाही जीव घेण्यासाठी, खून करण्यासाठी, आत्महत्येसारख्या टोकाच्या कृतींसाठी किंवा कोणत्याही प्रकारच्या गुन्हेगारी कारवायांसाठी नाहीत. अशा घटनांमुळे केवळ संबंधित कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त होत नाही, तर आपल्या ऐतिहासिक वारशालाही धक्का पोहोचतो. आज हजारो तरुण गडकिल्ल्यांवर जातात. अनेक जण मानसिक तणाव, नैराश्य किंवा जीवनातील संघर्षातून बाहेर पडण्यासाठी गडभ्रमंतीचा आधार घेतात.

गडकिल्ल्यांवर गेल्यानंतर त्यांना नवी ऊर्जा मिळते, इतिहासातून प्रेरणा मिळते आणि संकटांना सामोरे जाण्याची ताकद मिळते. अशा पवित्र आणि प्रेरणादायी ठिकाणांचा वापर जर गुन्हेगारी कृत्यांसाठी होऊ लागला, तर समाजापुढे चुकीचा संदेश जाईल. विशेषतः लोहगड, राजगड, रायगड, प्रतापगड, शिवनेरी यांसारखे गडकिल्ले हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची साक्ष देणारे आहेत. या गडांवर असंख्य मावळ्यांनी स्वराज्यासाठी प्राणांची आहुती दिली. ज्या ठिकाणी स्वराज्यासाठी बलिदान दिले गेले, त्याच ठिकाणांचा वापर वैयक्तिक सूड, हिंसा किंवा जीव घेण्यासारख्या अमानुष कृत्यांसाठी होणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. गडकिल्ले आपल्याला संघर्षातून मार्ग काढण्याची शिकवण देतात. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे हिरकणी. रायगडावर अडकलेल्या हिरकणीसमोर अंधार, भीती आणि मृत्यूचे संकट उभे होते. परंतु तिने परिस्थितीसमोर हार मानली नाही. आपल्या बाळासाठी तिने धाडसाने रायगडाचा कडा उतरून इतिहास घडवला. हिरकणीची कथा आपल्याला संकटांवर मात करण्याची प्रेरणा देते, जीवन संपविण्याची किंवा दुसऱ्याचा जीव घेण्याची नाही.आज गरज आहे ती समाजाने आणि प्रशासनानेही या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची. गडकिल्ल्यांवर सुरक्षा व्यवस्था वाढविणे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, पर्यटकांमध्ये जनजागृती करणे आणि गडकिल्ल्यांचे पावित्र्य जपण्यासाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रत्येक शिवप्रेमीने एक गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे – गडकिल्ले हे प्रेरणा घेण्यासाठी आहेत, गुन्हे करण्यासाठी नाहीत. गडकिल्ले हे जीवनाला नवी दिशा देण्यासाठी आहेत, कोणाचाही जीव घेण्यासाठी नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या या पवित्र स्थळांचा सन्मान राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. गडकिल्ल्यांवर जा, इतिहास जाणून घ्या, प्रेरणा घ्या; पण या पवित्र भूमीला खून, आत्महत्या आणि गुन्हेगारी कृत्यांनी बदनाम करू नका.

# तुळजाभवानी मंदिराच्या जमिनींची चौकशी होतेये तर राज्यातील इतर मंदिरांच्या जमिनीचे काय?



सतीश भोसले,
पुणे

तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या कथित जमीन गैरव्यवहाराबाबत चौकशीची मागणी होत आहे. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण व्हावे, गैरव्यवहार झाला असेल तर सत्य बाहेर यावे आणि दोषींवर कायदेशीर कारवाई व्हावी, याबाबत कोणाचाही दुमत असण्याचे कारण नाही. मंदिर, मठ, देवस्थान किंवा कोणतीही सार्वजनिक संस्था असो, तिच्या मालमत्तेचे संरक्षण होणे ही शासनाची आणि समाजाची संयुक्त जबाबदारी आहे. मात्र, या संपूर्ण प्रकरणामुळे माझ्यासारख्या अनेक सर्वसामान्य नागरिकांच्या मनात काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या जमिनींचा प्रश्न उपस्थित करणारे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे अध्यक्ष तथा याचिकाकर्ते सुरेश कुलकर्णी यांनी हा विषय पुढे आणला, ही बाब स्वागतार्ह आहे. पण त्याचवेळी महाराष्ट्रातील इतर मंदिरांच्या जमिनींबाबत त्यांची भूमिका काय आहे, हेही जनतेसमोर स्पष्ट होणे आवश्यक आहे. भूम येथील राम मंदिर, पखरूड परिसरातील मंदिरांच्या जमिनी, सोलापूर येथील सिद्धेश्वर मंदिर, बार्शी येथील बारा ज्योतिर्लिंग मंदिर तसेच मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, परभणी, अहमदनगर आणि विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर, सातारा, मुंबई आणि इतर जिल्ह्यांतील अनेक देवस्थानांच्या जमिनींबाबत वेळोवेळी विविध चर्चा, तक्रारी किंवा आरोप समोर येत असतात. या सर्व प्रकरणांमध्येही महाराष्ट्र मंदिर महासंघ अभ्यास करून आवश्यक ती कायदेशीर पावले उचलणार आहे का? की त्यांची भूमिका केवळ काही निवडक प्रकरणांपुरतीच मर्यादित आहे? हा प्रश्न उपस्थित होतो.

महाराष्ट्र मंदिर महासंघ ही संघटना नेमकी किती व्यापक आहे, हेही नागरिकांना समजणे गरजेचे आहे. या संघटनेचे राज्यभरात किती सदस्य आहेत? किती जिल्ह्यांत संघटना कार्यरत आहे? या संघटनेचे पदाधिकारी कोण आहेत? आजपर्यंत मंदिरांच्या संरक्षणासाठी, अतिक्रमण हटविण्यासाठी किंवा कथित जमीन गैरव्यवहारांविरोधात किती लढे उभारले गेले? किती तक्रारी, याचिका किंवा न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहेत? या प्रयत्नांना समाजाचा किती प्रतिसाद मिळाला? या सर्व बाबी जनतेसमोर आल्यास संघटनेच्या कार्याचा वस्तुनिष्ठ आढावा घेता येईल. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, देवस्थानांच्या मालकीच्या जमिनी या कोणत्याही व्यक्तीच्या खासगी मालमत्ता नसून त्या सार्वजनिक आणि धार्मिक उद्देशांसाठी असतात. त्यामुळे अशा जमिनींवर जर कुठे अतिक्रमण, बेकायदेशीर हस्तांतरण किंवा नियमबाह्य व्यवहार झाले असतील, तर त्यांची चौकशी एकाच निकषावर व्हायला हवी. कोणतेही मंदिर मोठे किंवा छोटे, प्रसिद्ध किंवा अपरिचित असले तरी कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे. माझी अपेक्षा एवढीच आहे की, महाराष्ट्र मंदिर महासंघाने तुळजाभवानी मंदिराच्या प्रश्नासोबतच राज्यातील सर्व देवस्थानांच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी व्यापक धोरण जाहीर करावे. कोणत्या निकषांवर प्रकरणे निवडली जातात, कोणत्या मंदिरांच्या जमिनींचा अभ्यास सुरू आहे आणि पुढील काळात कोणती पावले उचलली जाणार आहेत, याबाबत त्यांनी खुली आणि सविस्तर भूमिका मांडावी. जर महाराष्ट्रातील सर्व मंदिरांच्या सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण हा या चळवळीचा उद्देश असेल, तर तो उद्देश राज्यातील प्रत्येक देवस्थानासाठी समानपणे दिसला पाहिजे. त्यामुळे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी यांनी पत्रकार परिषद, खुली चर्चा किंवा माध्यमांद्वारे जनतेच्या या प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्यावीत, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे गैरसमज दूर होतील आणि मंदिरांच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांबाबत जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल.

दैनिक आरंभ मराठी

## १४ जुलैला तेर येथे संत गोरोबा काकांच्या भेटीचा सोहळा

# श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे उद्या धाराशिव जिल्ह्यात होणार आगमन

आरंभ मराठी । तेर

शेगाव येथील श्री संत गजानन महाराजांचा पायी पालखी सोहळा उद्या रविवारी (दि.१२) सायंकाळी धाराशिव जिल्ह्यातील कळंब शहरात दाखल होत आहे. आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या या पालखी सोहळ्याचे मंगळवारी (दि.१४) रोजी सकाळी तेर नगरीत आगमन होणार असून, संत गोरोबा काकांच्या पावन भूमीत दोन संतांच्या भेटीचा भाविकांना अविस्मरणीय सोहळा अनुभवता येणार आहे. श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगाव येथून प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही पायी पालखी सोहळा २१ जून रोजी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाला आहे. यंदाचे हे पालखी सोहळ्याचे ५७ वे वर्ष असून, सुमारे ७०० वारकरी या दिंडीत सहभागी आहेत. यात जवळपास २५० झेंडेकरी, २५० टाळकरी आणि २०० सेवेकऱ्यांचा समावेश आहे. डोक्यावर पांढरी टोपी, कपाळी गंध, अंगावर शुभ्र पोशाख, खांद्यावर भगवी पताका, पुढे अश्व आणि बँड पथक, टाळ-मृदंगाच्या गजरात 'गण गण गणात बोते' आणि विठ्ठलनामाचा अखंड जयघोष करत शिस्तबद्ध पद्धतीने पालखीचा प्रवास सुरू आहे. विविध पारंपरिक कलाविष्कारांमुळे हा पालखी सोहळा भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. रविवारी गोटेगाव मार्गे पालखी कळंब शहरात दाखल होईल. कळंब आणि ढोकी येथील मुक्कामानंतर मंगळवारी सकाळी सुमारे ८ वाजता पालखी तेर नगरीत प्रवेश करेल. संत गोरोबा काकांच्या मंदिर परिसरात काही काळ विश्रांती घेतल्यानंतर पालखी हिंगळजवाडी मार्गे किनी येथे महाप्रसादासाठी थांबेल. त्यानंतर सायंकाळी उपळा येथे मुक्काम असेल. यानंतर १५ जुलै रोजी धाराशिव, १६ जुलै रोजी तुळजापूर मार्गे पालखीचा प्रवास पुढे सुरू राहणार आहे. उळे, सोलापूर, तिऱ्हे, माचणूर आणि मंगळवेढा मार्गे मजल-दरमजल करत ३३ दिवसांचा सुमारे ७५० किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण करून २३ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पालखी आषाढी वारीत सहभागी होणार आहे.



### पालखी सोहळा पाच दिवस धाराशिव जिल्ह्यात

श्री संत गजानन महाराजांचा पालखी सोहळा धाराशिव जिल्ह्यात पाच दिवस मुक्कामी राहणार आहे.

**१२ जुलै : कळंब**
**१३ जुलै : तेरणा सहकारी साखर कारखाना परिसर**
**१४ जुलै : उपळा**
**१५ जुलै : धाराशिव**
**१६ जुलै : तुळजापूर**
**यानंतर १७ जुलै रोजी पालखी पश्चिम महाराष्ट्रात प्रवेश**

# राज्यपाल परिवाराचे प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांना 'कळंब भूषण' पुरस्कार

## रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचा पदग्रहण सोहळा १२ जुलै रोजी

**कळंब** :- समाजसेवा, नेतृत्व आणि गुणवंतांचा सन्मान या रोटरीच्या परंपरेला यंदाही उजाळा मिळणार असून, रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी व इनर व्हील क्लब ऑफ कळंब सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १२ जुलै रोजी सकाळी ११ वाजता श्री महावीर भवन, कथले चौक, कळंब येथे पदग्रहण सोहळा व 'कळंब भूषण' पुरस्कार वितरण समारंभ उत्साहात होणार आहे. या सोहळ्यात महाराष्ट्र राज्यपाल परिवाराचे प्रबंधक डॉ. निशिकांत श्रीधरराव देशपांडे यांना प्रशासकीय सेवेत चार दशकांहून अधिक काळ केलेल्या उल्लेखनीय, विकासाभिमुख व लोकहितवादी कार्याबद्दल प्रतिष्ठेचा 'कळंब भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीच्या अध्यक्षपदी रो. रवी नरहिरे तर सचिवपदी रो. अभिजीत भिसे पदभार स्वीकारणार आहेत. तसेच इनर व्हील क्लब ऑफ कळंब सिटीच्या अध्यक्षा सौ. पूर्वा पोरे व सचिव सौ. स्वाती राजमाने यांचाही पदग्रहण सोहळा यावेळी होणार आहे. कार्यक्रमात प्रा. माया सूर्यकांत मुळे (शिराढोण) या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहणार असून, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट रो. सतीश लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. रोटरी क्लबचे विद्यमान अध्यक्ष रो. डॉ. अभिजीत जाधवर, सचिव रो. श्याम जाधवर तसेच इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा प्रा. प्रतिभा भवर व सचिव डॉ. दिपाली लोंढे यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून कळंब शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त केला जाणार आहे.



### 'कळंब भूषण' सन्मानाचे विशेष महत्त्व

कळंब परिसरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीतर्फे दरवर्षी 'कळंब भूषण' पुरस्कार प्रदान केला जातो. यंदा हा मान राज्य प्रशासनात उत्कृष्ट कार्याचा ठसा उमटविणारे डॉ. निशिकांत देशपांडे यांना जाहीर झाल्याने कळंबच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या सन्मानामुळे प्रशासकीय सेवेत कार्यरत अधिकारी तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
» पुणे कार्यालयः 1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

## विविध वृत्त

### धाराशिव भाजप ओबीसी मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी दीपक घोडके यांची निवड

आरंभ मराठी । अणदूर



तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते व सामाजिक कार्यकर्ते दीपक घोडके यांची धाराशिव जिल्हा भाजप ओबीसी मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. धाराशिव भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष विजय शिंगाडे यांनी शुक्रवारी (दि.१०) घोडके यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. पक्ष संघटनेतील त्यांच्या दीर्घकालीन कार्याची दखल घेत ही जबाबदारी सोपविण्यात आल्याचे सांगण्यात आले. दीपक घोडके हे गेल्या अनेक वर्षांपासून भाजपचे निष्ठावान व निस्वार्थी कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत. ग्रामीण भागात भाजपची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाच्या यशासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या संघटन कौशल्याचा व कार्यानुभवाचा विचार करून पक्षाने त्यांच्यावर जिल्हा ओबीसी मोर्चाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे. घोडके यांच्या निवडीबद्दल युवा नेते सुनील चव्हाण, जिल्हा सरचिटणीस साहेबराव घुगे, दीपक आलूरे, धनराज मुळे, अप्पू धमुरे, प्रवीण घोडके, निलेश आलूरे, अंकुश चीनकारे, बालाजी कुलकर्णी, गुंडेशा गोवे, दीपक घुगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसी येथे पदवीदान समारंभ उत्साहात




आरंभ मराठी । धाराशिव

डॉ. व्ही. पी. एज्युकेशनल कॅम्पस अंतर्गत आर. पी. कॉलेज ऑफ फार्मसी, धाराशिव येथे पदवीदान समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे विश्वस्त डॉ. प्रतापसिंह पाटील तसेच डॉ. वीणा पाटील (शासकीय आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव) यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख गाझी होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. शेख गाझी यांनी पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञान, कौशल्य आणि सेवाभावाच्या बळावर महाविद्यालयाचे नाव देश-विदेशात उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रमुख अतिथी संस्थेचे विश्वस्त डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी फार्मसी व्यवसायातील नैतिक मूल्यांचे पालन करत रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले. तर डॉ. वीणा पाटील मॅडम यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे ज्ञानार्जन करून समाजसेवा, संशोधन आणि आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. विजय सुतार होते. सूत्रसंचालन प्रा. अबोली निरवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. गणेश मते यांनी केले. या समारंभास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### पारा येथे पशुपालक व शेतकऱ्यांना मोफत मका बियाण्यांचे वाटप



आरंभ मराठी । वाशी

धाराशिव जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाच्या वतीने वाशी तालुक्यातील पारा येथे गुरुवारी (दि.९) पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील गरजू शेतकरी व पशुपालकांसाठी मोफत मका बियाणे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाराष्ट्राचे माजी आरोग्यमंत्री तथा भूम-परांडा-वाशी मतदारसंघाचे आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत आणि भैरवनाथ शुगरचे व्हाईस चेअरमन केशव उर्फ विक्रम सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा शेतकरी हिताचा उपक्रम राबविण्यात आला. पारा जिल्हा परिषद सदस्या अश्विनी सुनिल उंदरे यांच्या हस्ते लाभार्थी शेतकरी व पशुपालकांना मका बियाण्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य अशोक भराटे, विकास सेवा सोसायटीचे चेअरमन विश्वंभर भराटे, पिंपळवाडीचे सरपंच सुनिल उंदरे, जीवन बप्पा भराटे, डॉ. बाबर, विकास पानसे, सखाराम बप्पा भराटे, सुरेश भराटे, बाजीराव भराटे, बजरंग पाटील, मुकुंद भराटे, भरत कुदळे, विनोद शिनगारे, दीपक अंधारे, विकास भराटे, ऋषी भराटे यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे पशुधनासाठी सकस हिरवा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार असून, शेतकरी व पशुपालकांनी या योजनेबद्दल समाधान व्यक्त केले.

### श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेजमध्ये बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य

आरंभ मराठी । धाराशिव



**धाराशिव** :- धाराशिव येथील श्रीपतराव भोसले जुनिअर कॉलेजमध्ये इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बंधनकारक करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करण्याबरोबरच सुरक्षितता अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने महाविद्यालयाच्या संपूर्ण परिसरात आणि प्रत्येक वर्गखोलीत सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र बायोमेट्रिक मशीनची व्यवस्था करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना दररोज बायोमेट्रिकद्वारे उपस्थिती नोंदविणे अनिवार्य राहणार आहे. त्यामुळे उपस्थितीची अचूक नोंद होण्यास मदत होणार असून, शैक्षणिक शिस्तीला चालना मिळणार आहे. खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश घेऊन महाविद्यालयातील नियमित तासिकांना दांडी मारणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवणे तसेच नियमित उपस्थितीची सवय लागावी, या उद्देशाने शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार हा उपक्रम राबविण्यात आला आहे. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आदित्य पाटील यांच्या सूचनेनुसार तसेच प्राचार्य नंदकुमार नन्नवरे आणि उपप्राचार्य संतोष घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. संस्थाध्यक्ष सुधीर पाटील तसेच सरचिटणीस प्रेमाताई पाटील यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे सुरू करण्यात आल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले.

# पावसासाठी लोहगावचा अनोखा नवस; गाढवांचा थाटामाटात विवाह, गावभर मिरवणुकीनंतर महाप्रसाद

आरंभ मराठी । नळदुर्ग

**एक महिन्याहून अधिक काळ उलटूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने तुळजापूर तालुक्यातील लोहगाव परिसरात दुष्काळाची चिंता वाढू लागली आहे. पावसाअभावी जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा तसेच चाऱ्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने चिंताग्रस्त झालेल्या शेतकरी व ग्रामस्थांनी शुक्रवारी (दि. १० जुलै) वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी पारंपरिक श्रद्धेनुसार एक आगळावेगळा धार्मिक-सांस्कृतिक उपक्रम राबविला. गावात पाऊस पडावा आणि दुष्काळाचे संकट दूर व्हावे, या भावनेतून ग्रामस्थांनी चक्क गाढवांचे लग्न लावून दिले. या अनोख्या विवाह सोहळ्याची परिसरात मोठी चर्चा रंगली असून सोशल मीडियावरही या कार्यक्रमाचे फोटो आणि व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.**



#### 'वरुणराजाला प्रसन्न करण्याची ही जुनी लोकश्रद्धा'

पूर्वीचे वडीलधारी सांगायचे की, वरुणराजा एका शिळेखाली लपून बसलेले होते आणि त्यांचे ठिकाण फक्त गाढवालाच माहीत होते. वरुणराजा गाढवावर प्रसन्न असल्याची लोकश्रद्धा आहे. त्यामुळे गाढवाला प्रसन्न केले, त्याचा सन्मान केला आणि त्याचे लग्न लावले तर वरुणराजाही प्रसन्न होऊन पाऊस पाडतो, अशी परंपरेने चालत आलेली श्रद्धा आहे. म्हणूनच गावात गाढवांचे लग्न लावून त्यांना खुश केले जाते.

**माणिक लांडगे,**
**ज्येष्ठ शेतकरी, लोहगाव.**

गावातील अहिल्यावती नगर येथून या अनोख्या विवाह सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. यासाठी एक नर आणि एक मादी गाढव शोधून आणण्यात आले. दोन्ही गाढवांना प्रथम अंघोळ घालण्यात आली. त्यानंतर त्यांना हळद लावून नवीन कपडे परिधान करण्यात आले तसेच फुलांचे हार घालून आकर्षक पद्धतीने सजविण्यात आले.

पारंपरिक विवाह सोहळ्याप्रमाणे संपूर्ण तयारी करण्यात आली होती. सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास सजविण्यात आलेल्या या अनोख्या जोडप्याची गावातून वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. अहिल्यावती नगर येथून सुरू झालेली ही मिरवणूक क्रांती चौक, स्वामी गल्ली, कुंभार गल्ली, विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासमोरून महादेव मंदिरापर्यंत काढण्यात आली.

ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्यांचा निनाद आणि ग्रामस्थांचा उत्साह यामुळे संपूर्ण गावात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. या मिरवणुकीत ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे महिला आणि तरुणांचा सहभाग लक्षणीय होता. अनेकांनी या अनोख्या सोहळ्याचे मोबाईलवर चित्रीकरण केले.

महादेव मंदिरासमोर मिरवणूक पोहोचल्यानंतर पुरोहितांच्या हस्ते गाढवांची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर मंगलाष्टके वाजवून पारंपरिक हिंदू विवाह पद्धतीनुसार गाढवांचा विवाह सोहळा संपन्न करण्यात आला. उपस्थितांनी या अनोख्या जोडप्यावर अक्षता टाकून शुभेच्छा व आशीर्वाद दिले. विवाह सोहळ्यानंतर क्रांती चौक येथे ग्रामस्थांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

गावातील नागरिकांनी एकत्र येत या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. गावात पाऊस पडावा, शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान मिळावे आणि दुष्काळाचे संकट दूर व्हावे, अशी प्रार्थना यावेळी ग्रामस्थांनी वरुणराजाकडे केली.

या आगळ्यावेगळ्या विवाह सोहळ्याची चर्चा सध्या लोहगावसह संपूर्ण परिसरात रंगली असून सोशल मीडियावरही या कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे.

यावेळी सरपंच प्रवीण पाटील, राहुल मारेकर, शिवा होटगे, शांतीय्या स्वामी, बिरू बनसोडे, काशिनाथ शिंगाडे, सचिन शिंगाडे, विकास पांढरे, निवृत्ती माने, नामदेव मारेकर, प्रवीण बंडगर, दिगंबर फरताळे, श्रीकांत माने, संतोष कलशेट्टी, सुदर्शन मारेकर, राम बनसोडे, अतुल दबडे, अमोल पाटील, गुरुनाथ शिंगाडे, अभिजीत पाटील, संतोष बिराजदार, बसवराज कलशेट्टी, वाल्मीक पांढरे, रायाप्पा बनसोडे, नेताजी लांडगे, विजयकुमार देशमुख, बबन कुंभार, महेबूब शेख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा जाहीर पाठिंबा

आरंभ मराठी । धाराशिव




धाराशिव जिल्हा शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने शिक्षकांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी गुरुवारी झालेल्या धरणे आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. शिक्षकांच्या प्रश्नांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली आहे. समितीचे अध्यक्ष तथा समन्वयक यांना पाठविलेल्या निवेदनात डॉ. पाटील यांनी शिक्षकांवर वाढत चाललेला अशैक्षणिक कामांचा बोजा, बीएलओ (BLO) सारख्या अतिरिक्त जबाबदाऱ्या, संचमान्यता (जीआर) संदर्भातील प्रश्न, पदोन्नतीतील अडचणी तसेच सन २०२३ पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी (TET) संदर्भात दिलासा देण्याची मागणी या सर्व बाबी न्याय्य असल्याचे नमूद केले आहे. शिक्षकांना फक्त शिकवू द्या – विद्यार्थ्यांना शिकू द्या ही भूमिका शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत, शिक्षकांना अध्यापनासाठी पूर्ण वेळ उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा संपूर्ण नैतिक पाठिंबा असल्याचे स्पष्ट करत, शासनाने शिक्षकांच्या सर्व न्याय्य मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी केली. तसेच शिक्षकांच्या आंदोलनास शुभेच्छा देत पक्षातर्फे पूर्ण सहकार्याची ग्वाही त्यांनी दिली.

## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ज्ञानदा कुलकर्णीची रेडबेरील टेक सोल्युशन्समध्ये निवड



आरंभ मराठी । धाराशिव

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थिनी ज्ञानदा योगेश कुलकर्णी हिची पुण्यातील रेडबेरील टेक सोल्युशन्स प्रा. लि.मध्ये यूएक्स/यूआय डेव्हलपर इंटर्न म्हणून आकर्षक वेतन पॅकेजसह निवड झाली आहे. या यशानिमित्त महाविद्यालयात तिचा व आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला. ज्ञानदाने दहावी व डिप्लोमा परीक्षा विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण केल्या आहेत. शिक्षणादरम्यान तिने सिम्बॉयसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीतून जावा डेव्हलपर सर्टिफिकेशन पूर्ण केले. तसेच इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड उपक्रमांतर्गत प्रशिक्षण व इंटर्नशिप पूर्ण करून सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, यूएक्स/यूआय डिझाइन आणि उद्योगाभिमुख कौशल्यांचा अनुभव घेतला. महाविद्यालयात ती मेहनती, जिद्दी व गुणवंत विद्यार्थिनी म्हणून ओळखली जात होती. तिने तांत्रिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि सहशालेय उपक्रमांतही सक्रिय सहभाग नोंदविला. सातत्यपूर्ण मेहनत आणि कौशल्यविकासामुळे तिला ही संधी मिळाली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी ज्ञानदा तसेच तिचे आई-वडील योगेश कुलकर्णी व प्रतिभा कुलकर्णी यांचा सत्कार करून अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख व आधुनिक कौशल्ये देण्यावर महाविद्यालयाचा भर असल्याने त्यांना नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या संधी मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयात कॅपजेमिनी, टीसीएस, इन्फोसिस आदी कंपन्यांच्या प्रशिक्षण व इंटर्नशिप कार्यक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. तसेच सिम्बॉयसिस स्किल युनिव्हर्सिटीसोबतच्या कौशल्य विकास करारामुळे प्लेसमेंट आणि वेतन पॅकेजमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. ज्ञानदाच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील, मल्हार पाटील, व्यवस्थापकीय समन्वयक प्रा. गणेश भातलवंडे, प्राचार्य डॉ. माने तसेच सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले.

## वाढदिवसानिमित्त नगरसेवक सागर कदम यांच्याकडून पाणीपुरवठा विभागातील 30 कर्मचाऱ्यांना रेनकोट भेट

**तुळजापूर** :- वाढदिवसाचा आनंद सामाजिक उपक्रमातून साजरा करत तुळजापूर नगरपरिषदेचे नगरसेवक तथा पाणीपुरवठा सभापती सागर कदम यांनी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील ३० कर्मचाऱ्यांना रेनकोट भेट देत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. शहरातील नागरिकांना नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी पावसाळ्यातही प्रतिकूल परिस्थितीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळावे,



या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. पावसापासून बचाव होऊन कर्मचाऱ्यांना अधिक सुरक्षितपणे कर्तव्य बजावता यावे, हीच या भेटीमागील भावना असल्याचे सागर कदम यांनी सांगितले. नगराध्यक्ष विनोद गंगणे, गटनेते औदुंबर कदम आणि विशाल रोचकरी यांच्या हस्ते कर्मचाऱ्यांना रेनकोटचे वितरण करण्यात आले. यावेळी नरेश अमृतराव, विजय कंदले, मधुकर शेळके, रत्नदीप भोसले, आनंद सावंत, लखन पेंदे, अण्णाभाई क्षीरसागर, अजित परमेश्वर तसेच पाणीपुरवठा कर्मचारी महादेव शिंदे यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक आरंभ मराठी

भंगार घेऊन जाणारे ट्रक अडवले; जाहीर लिलाव व विक्रीतील २५ टक्के हिस्सा देण्याची मागणी

# भंगार विक्रीवरून तेरणा साखर कारखान्यात आंदोलन; थकित देयकांसाठी सेवानिवृत्त कर्मचारी आक्रमक

आरंभ मराठी । ढोकी



तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखान्यातील भंगार विक्रीत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत सेवानिवृत्त कर्मचारी आणि सभासदांनी गुरुवारी (दि.९) कारखान्यावर धडक देत भंगार घेऊन जाणारे ट्रक अडवून आंदोलन केले. कर्मचाऱ्यांची थकीत वेतन, ग्रॅच्युइटी व निवृत्तीवेतनाची सुमारे ५५ ते ६० कोटी रुपयांची देयके अद्यापही प्रलंबित असल्याने आंदोलनकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. तेरणा साखर कारखाना २५ वर्षांच्या भाडेतत्त्वावर भैरवनाथ समूहाकडे चालविण्यास देण्यात आला आहे.

भाडेकरारानुसार कारखान्याच्या भाड्याची रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे जमा होत असून, त्या रकमेतील २५ टक्के हिस्सा कारखान्याच्या जुन्या देणी भागविण्यासाठी अवसायकांकडे वर्ग करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. या रकमेतून कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतन, ग्रॅच्युइटी आणि निवृत्तीवेतनाची देयके अदा होण्याची अपेक्षा होती. मात्र, भाडेकराराला चार वर्षे उलटूनही कर्मचाऱ्यांना एक रुपयाही मिळालेला नसल्याचा आरोप करण्यात आला. दरम्यान, जिल्हा बँकेने कारखान्यातील भंगाराची विक्री बाजारभावापेक्षा कमी दरात केल्याची माहिती मिळाल्यानंतर कर्मचारी आणि सभासदांनी कारखान्यात धाव घेतली. भंगार घेऊन जाण्यासाठी आलेले ट्रक अडवत त्यांनी विक्री प्रक्रियेवर आक्षेप नोंदविला. कामगार संघटनेच्या म्हणण्यानुसार, कारखान्यातील भंगाराची बाजारभावानुसार अंदाजे किंमत १० कोटी रुपये असताना कोणतीही जाहीर लिलाव प्रक्रिया न राबविता ते हैदराबाद येथील व्यापाऱ्याला केवळ ५ कोटी रुपयांत विकण्यात आल्याचा आरोप आहे. या व्यवहाराची सखोल चौकशी करून विक्री तातडीने थांबविण्याची मागणी संघटनेने केली आहे. जोपर्यंत भंगाराचा जाहीर लिलाव होत नाही आणि विक्रीतून मिळणाऱ्या रकमेतील २५ टक्के हिस्सा कर्मचाऱ्यांना दिला जात नाही, तोपर्यंत कारखान्यातील भंगाराचा एकही तुकडा बाहेर जाऊ देणार नाही, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली. यासंदर्भात भैरवनाथ शुगरचे लेबर ऑफिसर कवडे यांना निवेदन देऊन कारखान्यातील भंगार बाहेर नेण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली. तसेच प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांच्याकडे ई-मेलद्वारे तक्रार दाखल करून भंगार विक्रीची चौकशी करून व्यवहार तातडीने स्थगित करण्याची मागणी करण्यात आली आहे. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष मधुकर मोटे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. या व्यवहारातून काही रक्कम कर्मचाऱ्यांना देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिल्यानंतर वातावरण काहीसे शांत झाले. या आंदोलनात संग्राम देशमुख, एस. के. इनामदार, कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष राजपाल देशमुख, ए. बी. काझी यांच्यासह मोठ्या संख्येने सेवानिवृत्त कर्मचारी व सभासद सहभागी झाले होते.

# २५ हजारांपेक्षा अधिक पगार घेणारे शेतकरी कर्जमाफीपासून वंचित; लोकप्रतिनिधींनाही लाभ नाही

## शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून शिक्षक, कर्मचारी, पंचायत समिती सदस्यांसह अनेक शेतकरी अपात्र

सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत शासनाने लाभार्थी निश्चित करण्यासाठी कठोर निकष लागू केले असून, दरमहा २५ हजार रुपयांपेक्षा अधिक वेतन घेणारे कर्मचारी, लोकप्रतिनिधी, आयकरदाते, व्यावसायिक तसेच सहकारी संस्थांचे संचालक यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेती हा मुख्य व्यवसाय असूनही नोकरी करणारे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. धाराशिव जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ७ हजार ६२९ थकीत कर्जदार शेतकऱ्यांना सुमारे ५३ कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार असून, १५ जुलैपासून संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत लाभार्थी शेतकरी लोकप्रतिनिधी नसावा, ही महत्त्वाची अट शासनाने घातली आहे. याशिवाय दरमहा २५ हजार रुपयांपेक्षा अधिक वेतन घेणारे कर्मचारीही या योजनेसाठी अपात्र ठरणार आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांसह सहकारी संस्थांच्या सदस्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही. तर शेती करणारे शेतकरी असूनही २५ हजारांपेक्षा अधिक वेतनावर नोकरी करत असल्यास अशा शेतकऱ्यांनाही कर्जमाफीपासून वंचित राहावे लागणार आहे. शेतकरी गेल्या तीन वर्षांपासून कर्जमाफीची प्रतीक्षा करीत आहेत. शासनाने मागील महिन्यात याबाबत घोषणा केल्यानंतर आता प्रत्यक्ष अंमलबजावणीला सुरुवात होत आहे. निकषांनुसार प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षकांचे वेतन २५ हजार रुपयांपेक्षा अधिक असल्याने सर्वाधिक कर्मचारी या योजनेतून अपात्र ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शिक्षकवर्गातील अनेक शेतकरी या निर्णयामुळे नाराज असल्याची चर्चा आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेले दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्यात येणार आहे. धाराशिव जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सुमारे ७ हजार ६२९ थकीत कर्जदार शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार असून, त्यांचे सुमारे ५३ कोटी रुपयांचे कर्ज माफ होणार आहे. प्रशासनाने लाभार्थी असलेल्या ७ हजार ६२९ शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड केली आहे. येत्या १५ जुलैपासून कर्जमाफीची रक्कम संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे तीन वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, दुसरीकडे पात्रतेचे निकष कठोर असल्याने अनेक शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहेत. विशेषतः अल्प वेतनावर नोकरी करणारे आणि शेतीवर अवलंबून असलेले कर्मचारी, तसेच ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधींमध्ये या निर्णयाबाबत नाराजी व्यक्त होत आहे. अनेकांनी लोकप्रतिनिधी असल्याच्या एका निकषावर सर्वांना अपात्र ठरविण्याऐवजी आर्थिक स्थिती आणि प्रत्यक्ष शेतीवरील अवलंबित्व विचारात घेण्याची मागणी केली आहे.




### यांना योजनेचा लाभ मिळणार नाही

कर्जमुक्ती योजनेचा लाभ लोकप्रतिनिधी, शासकीय कर्मचारी, आयकर भरणारे आणि व्यावसायिक यांना मिळणार नाही. विद्यमान आणि माजी मंत्री, खासदार, आमदार तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे (नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद आदी) सदस्य व सहकारी संस्थांचे संचालक यांना कर्जमाफीपासून वंचित राहावे लागणार आहे.

### या शेतकऱ्यांना मिळणार लाभ

ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्प मुदत पीक कर्ज ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत आहे. ज्या अल्प मुदत पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन / फेरपुनर्गठन झाले आहे आणि त्याचे हप्ते ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत आहेत, त्यांनाही लाभ मिळेल. नियमित कर्जफेड करणारे जे शेतकरी वेळेवर कर्जाची परतफेड करतात, त्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे.

### जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून पात्र असलेले शेतकरी

| तालुका | शेतकरी | र्जमाफी रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| धाराशिव | २७१७ | २३.८६ |
| कळंब | १३७९ | ८.७९ |
| परंडा | ९८१ | ५.८७ |
| तुळजापूर | ८६९ | ५.८७ |
| उमरगा | ६०१ | ४.२० |
| वाशी | ५०३ | २.२२ |
| भूम | ३८३ | १.७१ |
| लोहारा | १९६ | १.२५ |

### केवळ १२०० रुपये मानधन मिळणारे पंचायत समिती सदस्य अपात्र

सर्वसामान्य कुटुंबातून निवडून आलेल्या आणि अत्यंत कमी मानधनावर जनतेची सेवा करणाऱ्या सदस्यांना 'लोकप्रतिनिधी' या एका शिक्क्यामुळे योजनेपासून दूर ठेवणे हा सरळ अन्याय असल्याची भावना व्यक्त होत आहे. ग्रामीण भागात पंचायत समिती सदस्यांना दरमहा अवघे १२०० रुपये मानधन मिळते. या अल्प उत्पन्नातून स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह, शेतीची कामे, सामाजिक जबाबदाऱ्या आणि जनतेची सेवा अशी कसरत अनेक सदस्य करत असतात. अनेक सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून निवडून आलेले आहेत. त्यांच्यावर देखील कर्जाचे ओझे आहे. मात्र केवळ लोकप्रतिनिधी असल्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. केवळ १२०० रुपये मानधन असलेल्या पंचायत समिती सदस्यांची यामुळे निराशा झाली आहे.

# उद्यापासून 200 अतिरिक्त बसफेऱ्या सुरू

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

आरंभ मराठी । मुंबई

मुंबई–पुणे मार्गावरील दररोज धावणाऱ्या सुमारे ३० रेल्वे गाड्या रद्द असल्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने तातडीने अतिरिक्त बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. उद्यापासून या मार्गावर दररोज २०० अतिरिक्त बसफेऱ्या चालविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. या विशेष नियोजनाअंतर्गत ई-शिवनेरीच्या ३१२ नियोजित फेऱ्यांसह साध्या बसेसच्या २०० जादा फेऱ्या मुंबई–पुणे मार्गावर दररोज चालविण्यात येणार आहेत. यामुळे रेल्वे प्रवाशांना सुरक्षित, जलद आणि अखंड पर्यायी प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. याशिवाय, प्रवाशांची प्रत्यक्ष गर्दी लक्षात घेऊन संबंधित आगार आणि विभागांना आवश्यकतेनुसार आणखी जादा बसेस सोडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही प्रवाशाला वाहतुकीअभावी अडचण येऊ नये, यासाठी एसटी प्रशासन परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, 'संकटाच्या प्रत्येक काळात एसटीने जनतेचा विश्वास सार्थ ठरविला आहे. रेल्वे सेवा बाधित झाल्यानंतरही प्रवाशांचा प्रवास सुरळीत राहावा, यासाठी एसटी महामंडळ पूर्ण क्षमतेने सज्ज आहे. प्रवाशांची सुरक्षितता, सोय आणि वेळेवर सेवा हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य असून, गरजेनुसार आणखी अतिरिक्त बससेवा उपलब्ध करून देण्यात येईल.'

# 50 हजारांची अट रद्द; आता 2 लाखांपर्यंत कर्जमाफी

**मुंबईः-** राज्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'त महत्त्वपूर्ण बदल जाहीर केले. यापुढे महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील ५० हजार रुपयांच्या लाभाची अट रद्द करण्यात आली असून पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये कर्ज घेऊन वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे. विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही घोषणा केली. त्यांनी सांगितले की, राष्ट्रीयीकृत, व्यापारी, खासगी तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे राबविण्यात येणाऱ्या या योजनेचा राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार असून त्यासाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, पूर्वी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळत नव्हता. मात्र नव्या निर्णयानुसार दोन लाखांपेक्षा जास्त थकबाकी असली तरी दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी मिळणार आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी या योजनेच्या कक्षेत येणार आहेत

# आजपासून श्री १००८ शांतिनाथ पंचकल्याणक प्रतिष्ठा महामहोत्सव

## सहा दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम; एक लाख भाविकांची सोय

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरातील उंबरेकोठा परिसरातील पवन कॉलनी, फडकुले प्लॉट येथे नव्याने उभारण्यात आलेल्या श्री १००८ शांतिनाथ दिगंबर जैन मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त दि. ११ ते १६ जुलै या कालावधीत श्री १००८ शांतिनाथ तीर्थंकर दिगंबर जिनबिंब पंचकल्याणक प्रतिष्ठा महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सहा दिवस चालणाऱ्या या महोत्सवासाठी राज्यासह देशभरातून सुमारे एक लाख भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा असून त्यांच्या स्वागतासाठी भव्य मंडप, भोजन व्यवस्था, निवास व्यवस्था, वाहनतळ आणि अन्य सर्व आवश्यक सोयी पूर्ण करण्यात आल्या आहेत. या महोत्सवाला अक्षयसागरजी महाराज व निराकुलसागरजी महाराज यांचे सान्निध्य लाभणार असून त्यांच्या उपस्थितीत पंचकल्याणक प्रतिष्ठा विधी पार पडणार आहेत. धार्मिक वातावरणात होणाऱ्या या सोहळ्यासाठी जैन समाजात मोठा उत्साह आहे. शनिवारी (दि. ११) पहाटे सहा वाजता गुरुआज्ञा, नित्याभिषेक, शांतिधारा, पूजन, जप स्थापना व आचार्य पूजन या कार्यक्रमांनी महोत्सवास प्रारंभ होईल. सकाळी साडेसहा वाजता घटयात्रा व भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. त्यानंतर मंडप प्रवेश, मंडप उद्घाटन, मंडप शुद्धी, वेदी संस्कार, पात्र शुद्धी, सकलीकरण, नंदी विधान व इंद्रप्रतिष्ठा हे विधी होतील. दुपारी श्री स्थापना, पूजन, ध्वजारोहण, यागमंडळ विधान तसेच मुनीश्रींचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी संगीतमय महाआरती, शास्त्र प्रवचन, धर्म इंद्रसभा, माता-पिता स्थापना, अष्टकुमारींकडून माता परिचर्या, स्वप्नदर्शन व गर्भ कल्याणक संस्कार पार पडतील. रविवारी (दि. १२) नाभीराज दरबार, स्वप्न फळकथन, अष्टकुमारींकडून माता सेवा तसेच ५६ कुमारींकडून भेट समर्पण होणार आहे. सोमवारी जन्म कल्याणकानिमित्त संगीतमय महारथी, विशाल जन्माभिषेक यात्रा व पांडूकशिला कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. मंगळवारी तप कल्याणक, बुधवारी ज्ञान कल्याणक, तर गुरुवारी मोक्ष कल्याणक, वैदिक प्रतिष्ठा व कलशारोहण सोहळे होणार आहेत. या कालावधीत मुनी महाराजांची आहारचर्या, संगीत आरती, शास्त्र प्रवचन, सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत सभा, राज्याभिषेक, भेट समर्पण, महामंडलेश्वर सेनापती नियुक्ती, प्रवचन, दंडनीती, ब्राह्मणी सुंदरी शिक्षण, मोक्षोपदेश तसेच शेवटच्या दिवशी विश्व महाशांती यज्ञ व पूर्णाहुती यज्ञ हे कार्यक्रम होणार आहेत.

### विविध दात्यांच्या हस्ते मूर्ती प्रतिष्ठापना

महामहोत्सवात मूलनायक श्री शांतिनाथ भगवान यांची प्रतिमा मेघा व विशाल विजयकुमार आहाळे, आदिनाथ भगवान यांची प्रतिमा अंजली व रमेश साखरे, पार्श्वनाथ भगवान यांची प्रतिमा धीरज भारत दुरूगकर, भगवान महावीर यांची प्रतिमा रवींद्र शांतिनाथ देवधारे, तर अनंतनाथ भगवान यांची प्रतिमा जयश्री शामसुंदर कोरडे यांच्या हस्ते प्रतिष्ठापित केली जाणार आहे.मंदिरासाठी भूखंड दान करणारे त्रिशला व पवन फडकुले, शिखर निर्माणकर्ते सौरभ सुरेश खडकुले, चांदीचे छत्र दाते अलका नागेंद्र पुरंत व अक्षय नागेंद्र पुरंत, चांदीचे भामंडल दाते सुरेश बाबुराव फडकुले, वेदी निर्माणासाठी योगदान देणारे वृषभनाथ चाकवते, सारंग कोंडेकर, सुनीता रणदिवे, अनिल कस्तुरे, सुरेश ढोले, रमेश फडकुले व अरिहंत मोहीकर यांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे.

### विविध बहुमान

भगवंताचे माता-पिता होण्याचा मान सरिता व धर्मेंद्र जैन यांना देण्यात आला आहे. सौधर्म इंद्र म्हणून रेखा व रमेश फडकुले, कुबेर इंद्र म्हणून ज्योती व उल्हास चाकवते, महायज्ञनायक इंद्र म्हणून कल्पना व सुदेश फडकुले, यज्ञानायक इंद्र म्हणून राजश्री व प्रसन्न फडकुले, राजा श्रेयांश इंद्र म्हणून पद्मजा व प्रशांत जैन, ईशान इंद्र म्हणून संगीता व राजेंद्र फडकुले, प्रतिंद्र इंद्र म्हणून अर्चना व प्रणव अडकले, महामंडलेश्वर राजा म्हणून माही व मंथन उदगीरकर, तसेच श्वेता व सागर दुरूगकर, उज्वला व महावीर दुरूगकर यांना विविध धार्मिक मान प्रदान करण्यात आले आहेत. स्वर्ण सौभाग्यवती होण्याचा मान रश्मी अक्षय शहरकर यांना मिळाला आहे. या पंचकल्याणक प्रतिष्ठा महामहोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी जैन समाजासह सर्व धर्मीय नागरिकांना केले आहे.

# आष्टा (जहागीर) येथे बाल आरोग्य, पोषण व स्वच्छता समितीची बैठक उत्साहात

आरंभ मराठी । उमरगा



जागतिक लोकसंख्या दिन व मातृत्व सुरक्षा दिनानिमित्त उमरगा तालुक्यातील आष्टा (जहागीर) येथे ग्रामपंचायत कार्यालयात बाल आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची बैठक गुरुवारी (दि.९) आयोजित करण्यात आली होती. बैठकीत जून महिन्यातील समितीच्या कामकाजाचा आढावा घेऊन विविध आरोग्य व स्वच्छतेसंदर्भातील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत आरोग्य सेविका व आशा कार्यकर्त्यांनी माता व बालकांसाठी उपलब्ध आरोग्य सुविधा, १०८ रुग्णवाहिका सेवा, आजारी बालकांची काळजी, तसेच एचबीएनसी आणि जननी सुरक्षा योजनांबाबत माहिती देत जनजागृती केली. यावेळी सर्पदंश प्रतिबंध व उपचार, पावसाळ्यात पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता, पाणी साठवणूक, पाणी शुद्धीकरण तसेच स्वच्छतेच्या उपाययोजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीस समितीचे अध्यक्ष तथा सरपंच सतीश जमादार, सचिव तथा आशा कार्यकर्ती रोहिणी नंदकुमार जाधव, उपसरपंच बापुराव मोहनराव गायकवाड, अंगणवाडी सेविका सविता ज्ञानेश्वर गायकवाड, सविता भरत जाधव, समुदाय आरोग्य अधिकारी छाया जाधव, लक्ष्मी विष्णू पाटील, अनिता तुकाराम गायकवाड, पत्रकार आदिनाथ बलभीम भालेराव, ग्रामपंचायत शिपाई ज्ञानराज बाबरुवान गायकवाड, जलसुरक्षा रक्षक प्रसाद राजू गायकवाड, अंगणवाडी मदतनीस ज्योती सुधीर कुलकर्णी व शिल्पा मिथुन मोरे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक संजय ठाकरू पवार, डीपीएमपीडब्ल्यू जमादार (आरोग्य उपकेंद्र मळगी) यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

दैनिक आरंभ मराठी

## मागण्या मान्य न झाल्यास पक्षाकडून आंदोलनाचा इशारा

# आठवडी बाजारातील मूलभूत सुविधांसाठी काँग्रेसचे निवेदन

आरंभ मराठी । धाराशिव




धाराशिव शहरातील आठवडी बाजार परिसरात नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत काँग्रेसने नगर परिषद प्रशासनाकडे मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. मागण्या तातडीने पूर्ण न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा काँग्रेसच्या वतीने देण्यात आला.

धाराशिव शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष धनंजय राऊत यांनी जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर यांच्या उपस्थितीत नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. निवेदनात आठवडी बाजार परिसरात नियमित व प्रभावी स्वच्छता राखणे, बाजारासाठी उभारण्यात आलेल्या कठड्यांचा योग्य वापर करून आवश्यक ठिकाणी नवीन कठडे उभारणे, सिमेंट काँक्रीटचे रस्ते तयार करणे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, मुख्य नाल्याचे रखडलेले काम पूर्ण करणे, संपूर्ण परिसरात पुरेशी प्रकाश व्यवस्था करणे, सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची नियमित देखभाल करणे, संरक्षण भिंत व मुख्य प्रवेशद्वार उभारणे तसेच ग्राहकांसाठी स्वतंत्र वाहनतळाची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आठवडी बाजार हा शहरातील महत्त्वाचा व्यापारी केंद्रबिंदू असून येथे दर आठवड्याला मोठ्या संख्येने नागरिक, शेतकरी व व्यापारी येत असतात. मात्र, मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने सर्वसामान्यांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा नागरिकांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल. यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर, शहराध्यक्ष धनंजय राऊत यांच्यासह राजाभाऊ शेरखाने, शीला उंबरे, प्रशांत पाटील, खलील सय्यद, शिवाजी गायकवाड, मेहबूब पटेल, अग्निवेश शिंदे, वसंत मडके, दयानंद पाटील, अशोक बनसोडे, प्रभाकर लोंढे, नरसिंग पवार, अभिमान पेठे, अभिषेक बागल, अझर पठाण, सरफराज काझी, संतोष घोरपडे, पोपट शिंदे, महावीर चव्हाण, संकेत पडवळ, ॲड. जावेद काझी, विजय मुद्दे, गोरोबा झेंडे, राजेंद्र राऊत, हरिदास शिंदे, भारतराव काटे, सय्यद मन्सूर, बाबा मोमीन, चंद्रकांत जाधव, ॲड. अरविंद बेडगे, कल्याणकर करपे, नानाराव भोसले तसेच काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# डेहराडून येथील राष्ट्रीय आईस हॉकी स्पर्धेत चमकलेल्या श्रुती कांबळेचा समाज विकास संस्थेकडून गौरव



आरंभ मराठी । उमरगा

डेहराडून येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील आईस हॉकी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या श्रुती बाबासाहेब कांबळे हिचा उमरगा येथील समाज विकास संस्था आणि दान उत्सव समिती, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने रोख ३,५५१ रुपये, सन्मानचिन्ह तसेच भूमिपुत्र वाघ लिखित पुस्तके देऊन गौरव करण्यात आला. या सत्कार समारंभासाठी डॉ. कल्पना निखिल वाघ, व्यंकट पोद्दार, संजय कोथळीकर, अनिता कुलकर्णी (पुणे), इंजि. मनोहर सूर्यवंशी, मुरजानी पूनम क्लोथ (उमरगा), सुरेखाताई चौगुले-नारायणकर आणि रवींद्र पोतदार यांनी सहकार्य केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्रुतीच्या राष्ट्रीय स्तरावरील यशाचे कौतुक करत तिच्या पुढील क्रीडा कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. श्रुतीचे वडील बाबासाहेब कांबळे हे उमरगा शाखेत पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असून, त्यांच्या शांत, संयमी आणि मितभाषी स्वभावासह मुलीला दिलेल्या प्रोत्साहनाचेही विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी आदर्श पालक म्हणून बाबासाहेब कांबळे यांचाही भूमिपुत्र वाघ लिखित पुस्तके भेट देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास इंजि. किसन बाबरे आणि रवींद्र पोतदार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. समाज विकास संस्थेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे व्यवस्थापन अस्मिता सुरवसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन भूमिपुत्र वाघ यांनी मानले.

आरंभ मराठी